sakal

10.12.2014

# विदर्भ विशेष

# आदिवासी हितार्थ 'पेसा'चा वापर करा

## राज्यपाल राव : झरीजामणी तालुक्यातील ग्रामस्थांशी संवाद



पांढरवाणी : येथील ग्रामस्थांशी संवाद साधताना राज्यपाल. शेजारी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार, जिल्हाधिकारी राहुलरंजन महिवाल आदी.

**मुकुटबन (जि. यवतमाळ), ता. १० :** आदिवासी बांधवांच्या हितासाठी पेसा कायद्याची अंमलबजावणी करा, असे निर्देश राज्यपाल विद्यासागर राव यांनी दिलेत. ते झरीजामणी तालुक्यातील पांढरवाणी येथे आज नागरिकांशी संवाद साधताना बोलत होते.

सकाळी दहाच्या सुमारास राज्यपाल विद्यासागर राव यांचे पांढरवाणी येथे आगमन झाले. पांढरवाणी, शिबला, दुभाटी, उमरी आदी गावांतील आदीम जमातीशी राज्यपालांनी पेसा कायद्याबाबत सुसंवाद साधला. पेसा कायद्यांतर्गत परसोडी, येवती, उमरी, सालेभट्टी आणि खापरी येथील ग्रामवासींना वनहक्काचे पट्टे देण्यात येणार होते; मात्र राज्यपाल शिबला आश्रमशाळेला भेट देण्यासाठी निघाल्याने आदिवासी बांधवांना वनहक्काचे पट्टे मिळाले नाहीत. पांढरवाणी येथील अंगणवाडी केंद्राची पाहणी केल्यानंतर राज्यपालांच्या हस्ते भोजराज दंडाजे, पोतू आत्राम, सूर्यभान दंडाजे, सभा दंडाजे व सूर्यभान आत्राम यांना आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत १०० टक्के अनुदानावर ऑइल इंजिन देण्यात आले.